नागपूर
महासागर
वृत्तसागर
▪ शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ ▪



# भाजपा वाडी मंडळाच्या वतीने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली




■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३० :

दत्तवाडी येथील आमदार समीर मेघे यांच्या कार्यालयात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना भाजपा वाडी मंडळाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. कार्यक्रमा दरम्यान केशव बांदरे यांनी स्व. अजितदादा पवार यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांचे राजकीय व सामाजिक योगदान विषद केले. यावेळी नगराध्यक्ष नरेश चरडे, उपनगराध्यक्ष कल्पना सगदेव, पुरुषोत्तम रागीट, नगरसेवक आनंदबाबू कदम, बांधकाम सभापती दिनेश कोचे, महिला व बालकल्याण सभापती रेखा रोडे, उपसभापती मनोरमा येवले, नगरसेवक कमल कनोजे, नगरसेविका किरण लांजेवार, सविता इसळ, लीला रहांगडाले यांच्यासह गोविंदराव रोडे,टिंकू सिंह, कमलाकर इंगळे, अक्षय तिडके, नारायण केसरवानी, चंद्रशेखर देशभ्रतार, गुरुदास बावने, दिनेश उईके, दिवानजी रहांगडाले, आनंद यादव, विनोद सदार, राहुल तायडे, अरुण सिंह, उर्मिला चौरसिया, माधुरी थेटे, पिंकी करण, मंगला पडोळे, रंजीता यादव आदी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री उमियाशंकर नारायणजी हायस्कूलमध्ये गणतंत्र दिवस संपन्न




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

श्री उमियाशंकर नारायणजी हायस्कूलमध्ये ७७वा गणतंत्र दिवस हर्षोल्लासात संपन्न झाला. अध्यक्ष नरेंद्रभाई झा, मुख्य अतिथि अधिवक्ता शैलेशभाई द्विवेदी यांनी ध्वजारोहण करून कार्यक्रमाची की सुरुवात केली. विद्यार्थ्यांनी परेड तसेच रंगाबेरंगी कार्यक्रम प्रस्तुत केले. कार्यक्रमा अंतर्गत 10वी आणि 12वीच्या प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमात खेताभाई पटेल, चंद्रेशभाई बदानी, रचितभाई ठाकर, राजेशभाई ठाकर, पीयूषभाई ठाकर, गुजराती मंडळाचे पदाधिकारी, मुख्याध्यापिका संतोषी गुप्ता, पर्यवेक्षक अमृतलाल खेतानी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# सत्य-अहिंसेच्या विचारांपासून दूर जाणे देशासाठी घातक : विकास ठाकरे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

आज देशात द्वेष, फूट आणि असहिष्णुतेचे वातावरण निर्माण केले जात असताना राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे सत्य व अहिंसेचे विचारच देशाला एकसंध ठेवू शकतात. या मूल्यांपासून दूर जाणे हे देशाच्या एकतेसाठी घातक आहे, असे ठाम प्रतिपादन विकास ठाकरे, अध्यक्ष, नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटी व आमदार, पश्चिम नागपूर यांनी केले.

शहीद दिनानिमित्त आज नागपूर येथील व्हरायटी चौक येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. हा कार्यक्रम नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटी व जागतिक अहिंसा दिवस आयोजन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

यावेळी बोलताना विकास ठाकरे म्हणाले की, महात्मा गांधींच्या विचारांवर उभा असलेला भारत सर्वसमावेशक, लोकशाही आणि संविधाननिष्ठ आहे. मात्र सत्तेच्या लालसेपोटी आज संविधानिक मूल्ये कमजोर करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. काँग्रेस पक्ष देशात सत्य, अहिंसा, समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांसाठी अखंड लढा देत राहील. या कार्यक्रमात उपस्थित काँग्रेस नेते, नगरसेवक व कार्यकर्त्यांनी गांधीजींच्या विचारांवर चालण्याचा संकल्प व्यक्त करत देशातील लोकशाही, राष्ट्रीय एकात्मता आणि संविधानाचे रक्षण करण्याचा निर्धार केला.



कार्यक्रमास विकास ठाकरे, अध्यक्ष, नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटी व आमदार, पश्चिम नागपूर, विलास मुत्तेमवार, माजी केंद्रीय मंत्री व अध्यक्ष, जागतिक अहिंसा दिवस आयोजन समिती, आमदार (विधान परिषद) अभिजीत वंजारी तसेच काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# रविवारपासून वाडीत श्री राम कथा सप्ताह

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. ३० :

येथील माऊली नगर मध्ये स्व. श्री. कृष्णराव चरडे (गुरुजी) यांच्या स्मृती प्रित्यर्थ श्रीकृष्ण फाऊंडेशन व संयोजिका आशा चरडे यांच्या सहकार्याने श्री राम कथा सप्ताह व गजानन महाराज प्रकट दिन सोहळा रविवार १ फेब्रुवारी ते रविवार ८ फेब्रुवारी पर्यंत आयोजित केला आहे. रामायणाचार्य व शिवचरित्रकार ह.भ.प. किशोर महाराज ठाकरे (आळंदीकर) यांच्या सुश्राव्य वाणीद्वारे दररोज दुपारी २ ते ६ वाजता पर्यंत श्रीराम कथेचे निरूपण होणार आहे.

सप्ताह मध्ये दररोज सकाळी ६ वाजता काकडा आरती, सकाळी ८ वाजता श्री गजानन महाराज विजयग्रंथ पारायण, दुपारी १२ वाजता भजन, संध्याकाळी ६ वाजता हरीपाठ, रात्री ८ वाजता किर्तन व प्रवचन आदी धार्मीक कार्यक्रमाची रेलचेल राहणार आहे. सोमवार २ फेब्रुवारी रोजी ८ वाजता मेरे श्याम की सेवा मित्र मंडळ तर्फे श्री खाटू श्याम बाबा अखंड ज्योत दर्शन किर्तन सेवा राहणार आहे. यावेळी माऊली भजन मंडळ माऊली नगर, हनुमंत भजन मंडळ आदर्श नगर, रुख्मिनी भजन मंडळ आदर्श नगर, आदर्श भजन मंडळ आदर्श नगर यांची साथ संगत राहणार आहे. मंगळवार ३ फेब्रुवारी रोजी रात्री ८ वाजता माधव महाराज दियेवार यांचे प्रवचन, बुधवार ४ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजतापर्यंत आरोग्य तपासणी शिबीर, मोफत नेत्र तपासणी, चष्मे वाटप व मोतिया बिंदु ऑपरेशन, गुरुवार ५ फेब्रुवारी रोजी रात्री ८ वाजता ह.भ. प. प्रा.डॉ. प्रशांत महाराज ठाकरे यांचे किर्तन, शनिवार ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजता पर्यंत श्री संत गजानन महाराज पादुका दर्शन, रात्री ८ वाजता ह.भ.प. भुषण महाराज शिंगरवाडे यांच्या किर्तनाचे आयोजन केले आहे.रविवार ८ फेब्रुवारी रोजी गजानन महाराज प्रकटदिन सोहळा निमीत्य सकाळी ९ वाजता दिंडी मिरवणुक , दुपारी २ वाजता ह.भ.प. किशोर महाराज ठाकरे यांचे काल्याचे किर्तन, सायंकाळी ७ वाजता भव्य महाप्रसादाचे आयोजन केले आहे.

हरिनाम सप्ताहाचे नियोजन मृदंगवादक तेजस महाराज सांबरे (नाना) टेकडीवाडी यांचे असुन गायनाची जबाबदारी योगेश महाराज धानोरकर, पेंडवादक नितीन महाराज भादे , ऑर्गन एवं गायक दुर्योधन महाराज सोनवणे झाँकी प्रस्तुतकर्ता विक्की महाराज बाळकदे,टाळकरी संच कुणाल महाराज डफर यांची साथ संगत राहणार आहे.

# म.गांधी यांच्या प्रयत्नामुळे व त्यागाने स्वातंत्र्य मिळाले : डॉ. सुनील वाघमारे

■ महासागर प्रतिनिधी, कामठी, दि. ३० :

काँग्रेस कमिटी कामठी व काँग्रेस सेवादल कामठी यांनी संयुक्तपणे ३० जानेवारी रोजी शुक्रवार गांधी भवन कामठी म.गांधी यांच्या फोटोला फुलमाला अर्पण करुन श्रध्दांजली वाहिली.

या प्रसंगी डॉ सुनील वाघमारे अध्यक्ष काँग्रेस सेवादल कामठी व काँग्रेस कमिटी कामठी अध्यक्ष धिरज यादव आणि विपिन गायकवाड, पंकज खोब्रागडे, राजकुमार गेडाम, प्रकाश लाइनपांडे, मेहंदी हसन, कृष्णाजी यादव, राजेश कांबळे, इसरत खान परविन बाजी, धिरज नागदेवे, विष्णुजी चणोले आदी मान्यवर उपस्थित होते.

जनहितार्थ जनआक्रोश सोशल असोसिएशन महाराष्ट्र राज्यच्या शाखेने नागपुर जिल्हा कार्यालय कामठी येथिल चंद्रमनी नगरात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण केले. श्रद्धांजली अर्पण केली. म.गांधीनी स्वातंत्र्याकरिता प्रयत्न व पराकाष्ठा याविषयी वक्त्यांनी माहीती सांगीतली. या प्रसंगी सर्वश्री जेष्ठ नागरिक व नागपुर जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश अढाऊ गुरुजी, वकील तांबे, मनोहर राव खुरगे, बाल्या बोरीकर, हुसैन अली पत्रकार, जाफर अब्बास, मुमताज शेख, सुबोध चांदोरकर, बरकत अली, शहनशाह, अनवर भाइ, प्रुरुषोत्तम सेलोकर आदी उपस्थीत होते.



# सरस्वती शिशु मंदिरमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

केशव माधव शिक्षण संस्थाद्वारा संचालित सरस्वती माध्यमिक विद्यालयात 77 वा स्वातंत्र्य दिन मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून धरमपेठ हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक अजय निलदावार, संघ व विश्व हिंदू परिषद मुंबई धर्मप्रसारक प्रमुख( महाराष्ट्र,गोवा) पायल कनाके प्रमुख अतिथी होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केशव माधव शिक्षण संस्थेचे सचिव प्रशांत बोपर्डीकर होते. शाळेच्या मुख्याध्यापिका मृदुल भुते, गाडगे यांची कार्यक्रमाला उपस्थित होती. दीप प्रज्वलन करून व ध्वजारोहण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

# शिवसेनेतर्फे अजित दादा पवार यांना श्रद्धांजली




■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. ३० :

महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस चे पक्ष प्रमुख अजितदादा पवार यांच्या अकस्मात अपघाती मृत्यू मुळे संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली त्यांच्या अकस्मात निधनाने राजकीय पोकळी कधी ही नं भरून निघणार नाही, सर्व सामान्य जनतेच्या मनावर राज्य करणारा, गोरगरीबानवर स्वतःचे कुटुंबा प्रेमाने प्रेम करणारा नेता असा अकस्मात निघून जाणे ही महाराष्ट्राच्या जनतेच्या मनाला वेदना देणारी घटना आहे.

प्रसंगी काटोल शिवसेना तर्फे नमाजी अली यांच्या संपर्क कार्यालयात अजित दादा यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

प्रसंगी विदर्भ सह संघटक नमाजी अली, जिल्हा संघटक दिलिप गायकवाड, कामगार सेना जिल्हा समन्वयक प्रशांत बारई, जिल्हा उपाध्यक्ष माधव अनवाने, काटोल शहर प्रमुख विपुल देवपूजारी, मंगेश वाढबुधे, अरुण कोल्हे, जितेंद्र वंजारी, विक्रम सावळकर,अमोल थोटे, धनंजय भोयरकर,रिजवान सय्यद आदी सर्व शिवसैनिक उपस्थित होते.

# पोद्दार इंटरनॅशनल शाळेच्या प्रांगणात गणतंत्र दिवस साजरा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

देशाच्या स्वातंत्र्याची ओळख करून देणारा, भारतीय राज्यघटनेची माहिती सांगणारा व देशभक्तीची भावना मनात जागृत करणारा भारताचा राष्ट्रीय सण पोद्दार इंटरनॅशनल शाळेच्या प्रांगणात मोठा उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमांतर्गत अतिथी राहुल आर्या सर, शाळेचे प्राचार्य श्याम नारायण साहू सर यांच्या हस्ते तसेच उपप्राचार्या महुआ सरकार मॅम व मुख्याध्यापिका रश्मी कुमार मॅम यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण होऊन व तिरंग्याला सलामी देत राष्ट्रगान गाऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली.

देशभक्तीपर गीताचे सामूहिक गायन झाले, स्वागत गीत, नृत्य व शाळेतील एन.सी.सी. विद्यार्थ्यांचे आकर्षक परेडचे प्रदर्शन झाले, 'वंदे मातरम' या राष्ट्रगीताला १५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'वंदे मातरम' या थीमवर नाटक व नृत्य या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सुंदर प्रदर्शन झाले.




शालेय कार्यकाळात १०० टक्के उपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व मेडल देऊन तसेच शाळेत ५ व १० वषार्चा कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या शिक्षकांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

# इंदिराबाई भोसले महाविद्यालयात अजित पवार यांना श्रध्दांजली




■ महासागर प्रतिनिधी,
कुही, दि. ३० :

येथील राणी इंदिराबाईभोसले महाविद्यालयात रा.से.यो. विभागांतर्गत ऊपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

या प्रसंगी इतिहास विभाग प्रमुख डॉ.केने यांनी अजित दादांच्या राजकीय वाटचालीचा परीचय करून दिला राज्याला दिशा देनारा मजबूत नेता अकाली गेल्याने न भरून निघणारी महाराष्ट्राची हानी झाली आहे असे ते म्हणाले तर अध्यक्षीय स्थानावरून शोकसंवेदना व्यक्त करतांना प्राचार्य श्री गजानन मांडेकर यांनी अजितदादा महाराष्ट्राच्या कणखर करारी ध्येयवादी नेतृत्वाच्या परंपरेतील ओळख देणारे नेते होते लोकनेता हे संबोधन त्यांनी त्यांच्या कार्यशैलीने जनमानसात बिंबीत केले.

अफाट क्षमतेचे लोककल्याणाचा अहोरात्र वसा घेऊन धावनारे नेते अशे अपघाती जातात तेव्हा वर्तमान व भविष्याची फारमोठी हानी होते.जी भरून निघणे कठीण असते असे ते म्हणाले.

या प्रसंगी महाविद्यालयातील डॉ. कटमुसरे डॉ.चव्हाण, डॉ.झाडे, श्री घाटोळ, डॉ. करंभे, प्रा.पिसे, प्रा.खेडीकर, प्रा. सोमकुवर, ईश्वर धवड, राहूल बोरकर, मनिषा धवड, राजू देशमुख यांचेसह विजय देशमुख, संजय टेकाम, भरत वानखेडे, टेकेश्वर देशमुख व विद्यार्थी विद्यार्थ्यीनींची ऊपस्थीती होती. श्रध्दांजली सभेचे संचलन कु. स्नेहा भिवगडे या बी.कॉम. फायनलचे विद्यार्थ्यीनीने केले.

# दुर्घटनेत मृत झालेल्या कुटुंबाला अजय अग्रवालने दिला मदतीचा हात



■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. ३० :

कामठी येथील दाल ओली क्रमांक २ येथे लागलेल्या आगीत यश डिकोंडवार यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

ही घटना पाहिल्यानंतर, नगराध्यक्ष अजय अग्रवाल यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट दिली आणि शोकाकुल कुटुंबाची भेट घेतली. या दुःखाच्या वेळी कुटुंबाला आर्थिक मदत देण्यात आली आणि त्यांना सरकारी योजनांअंतर्गत मदत करण्याचे आश्वासन देण्यात आले. संबंधित विभागांना त्वरित कारवाई करण्याचे आश्वासन देण्यात आले. याप्रसंगी दिलीप बांडेबुचे, नीरज यादव, आशू अवस्थी, लालशिंग यादव सहित नगर परिषद कर्मचारी व गणमान्य नागरिक होते.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सेक्युलर)ची समीक्षा बैठक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

महापालिका निवडणुकीतील पक्षाच्या कामगिरीचा आढावा घेणे तसेच आगामी काळातील कार्यक्रम व धोरणांची दिशा निश्चित करण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सेक्युलर) नागपूर शहराच्या प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची समीक्षा बैठक लोनखैरी येथील एका रिसॉर्टमध्ये आयोजित करण्यात आली होती. विदर्भ अध्यक्ष दिनेश अंडरसहारे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक दुपारी १२ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत पार पडली.

बैठकीदरम्यान उपस्थित कार्यकर्त्यांनी प्रत्येक विषयावर सखोल व मोकळेपणाने मते मांडली. निवडणुकीतील त्रुटींचे आत्मपरीक्षण करून त्या सुधारण्याचा संकल्प करण्यात आला. तसेच जनतेशी निगडित ज्वलंत प्रश्नांवर सातत्याने संघर्ष उभारणे, काँग्रेस व भाजपसारख्या पक्षांपासून समदूर राहून रिपब्लिकन विचारांची जनशक्ती संघटित करणे, असे महत्त्वाचे निर्णय चचेअंती घेण्यात आले.



यावेळी महिला आघाडीच्या शहर अध्यक्षा रत्नमाला गणवीर, सचिन वरधे, शहर उपाध्यक्ष मनोज गजभिये, अरुण सहारे, शैलेश बेहेरे, सचिन हजारे, सुशीला खांडेकरी, अमर सूर्यवंशी यांच्यासह विशेष निमंत्रित सदस्य म्हणून उमेश गजभिये, डॉ. मनोज मेश्राम, छाया बेहेरे, पंकज गजभिये, लोखंडे ताई आदी सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत बोलताना दिनेश अंडरसहारे यांनी काँग्रेस पक्ष दिशाहीन अवस्थेत अडकलेला असून भाजपाची भूमिका लोकशाहीविरोधी असल्याची टीका केली. रिपब्लिकन पक्षाने वैचारिक स्पष्टता आणि संघटनात्मक बळ वाढवून जनतेच्या प्रश्नांसाठी ठामपणे लढण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# १,७५७ वाहन चालकांवर कारवाई

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण १,७५७ वाहन चालकांवर कारवाई करून १,९३,७५० रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये १ प्रकरणात १ आरोपीवर कारवाई करून २,४०० रुपयांचा माल जप्त केला. तसेच जुगार कायद्यान्वये २ प्रकरणात ३ आरोपींवर कारवाई करून एकूण १,९८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली. या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार असून वाहनचालकांनी वाहन चालविताना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे नागरिकांना करण्यात आले आहे.

# स्कूल ऑफ स्कॉलर्स येथे प्रजासत्ताक दिन साजरा




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

स्कूल ऑफ स्कॉलर्स, अत्रे लेआउट येथे २६ जानेवारी रोजी शाळेच्या मैदानावर ७६ वा प्रजासत्ताक दिन देशभक्तीच्या वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भारतीय संविधानातील मूल्यांचा सन्मान आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव करणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे माननीय वेदप्रकाश मिश्रा तसेच कर्नल विलास डांगे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शाळेच्या सीईओ आभा मेघे आणि प्राचार्या डॉ. शिल्पा नेवासकर यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढली. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रध्वजारोहणाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर नृत्य व गीतांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. सांस्कृतिक कार्यक्रमांतून राष्ट्रीय एकता व अभिमानाची भावना प्रभावीपणे व्यक्त झाली.

या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे सत्कार समारंभ. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या सुमारे ९० विद्यार्थ्यांना सुवर्णपदके व प्रमाणपत्रे प्रदान करून सन्मानित करण्यात आले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्रजासत्ताक दिनाचा हा सोहळा प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला, ज्यामुळे कार्यक्रमाला उपस्थित प्रत्येकाच्या मनात देशाविषयी अभिमान, जबाबदारी आणि वचनबद्धतेची खोल भावना निर्माण झाली.

# डब्ल्यूसीएल येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३० :

डब्ल्यूसीएलने २६ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात प्रजासत्ताक दिन साजरा केला. इंदूर येथील कंपनीच्या परेड ग्राउंडवर झालेल्या समारंभात, डब्ल्यूसीएलचे अध्यक्ष-सह-व्यवस्थापकीय संचालक जे.पी. द्विवेदी यांनी राष्ट्रध्वज फडकावला आणि सुरक्षा परेडचे निरीक्षण केले. त्यांनी पुढे टीम डब्ल्यूसीएलला संबोधित केले आणि उत्कृष्ट सुरक्षा कर्मचाऱ्यांना पुरस्कार प्रदान केले.

अध्यक्ष-सह-व्यवस्थापकीय संचालक जे.पी. द्विवेदी यांनी २५ जानेवारी २०२५ पर्यंतची स्थिती सांगताना सांगितले की डब्ल्यूसीएलने एकूण ४५.८९ दशलक्ष टन कोळशाचे उत्पादन केले आहे. या आर्थिक वर्षात, २५ जानेवारी २०२५ पर्यंत, डब्ल्यूसीएलने ४८.३४ दशलक्ष टन कोळसा पाठवला आणि २६८.६९ दशलक्ष घनमीटर जादा ओझे काढून टाकले.

त्यांच्या भाषणात, द्विवेदी यांनी वर्षातील कामगिरीवर प्रकाश टाकला. त्यांनी विश्वास व्यक्त केला की डब्ल्यूसीएलने या आर्थिक वर्षातील कोळसा उत्पादन, प्रेषण आणि ओबी काढण्याची उद्दिष्टे निश्चितच साध्य करेल.

डब्ल्यूसीएलने संचालक (वित्त) बिक्रम घोष, संचालक तांत्रिक (ऑपरेशन्स/प्रकल्प आणि नियोजन) आनंद प्रसाद, संचालक (मानव संसाधन) डॉ. हेमंत शरद पांडे, मुख्य दक्षता अधिकारी अजय मधुकर म्हेत्रे, झंकार महिला मंडळाच्या अध्यक्षा आभा द्विवेदी, उपाध्यक्षा रोझलिन घोष आणि रीना पांडे या कार्यक्रमाला विशेष पाहुणे होते. कार्यकारी समिती आणि कल्याण मंडळाच्या सदस्या, विभाग प्रमुख, वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रजासत्ताक दिनाच्या समारंभात कंपनीच्या सर्व क्षेत्रांनी प्रभावी आणि आकर्षक चित्ररथ सादर केले, ज्यामुळे सर्वांना मंत्रमुग्ध केले. बल्लारपूर प्रदेशातील चित्ररथाने प्रथम पारितोषिक, नागपूर प्रदेशातील चित्ररथाने द्वितीय पारितोषिक आणि माजरी प्रदेशातील



# विभागीय रेल्वे वापरकर्ते सल्लागार समिती बैठकीचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३० :



आग्नेय मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात विभागीय रेल्वे वापरकर्ते सल्लागार समितीची एक महत्त्वाची आणि सविस्तर बैठक नागपूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयात आयोजित करण्यात आली होती.

ही बैठक नागपूरचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीत समितीचे सदस्य, गौरव सिंह पारधी (आमदार-कटंगी), सुदीप जैन, लक्ष्मीचंद रोचवानी, विनोद चंदवानी, रितेश अग्रवाल, जयप्रकाश तिवारी, चिनू अजमेरा, सौरभ ठाकूर, शंकर सैरानी, राजेश महाजन, भास्कर किसनजी डांगे, सत्येंद्रसिंह ठाकूर, तरुण हातेल, विजय ठाकरे आणि मोना रघुवंशी उपस्थित होते.

या बैठकीला विभागीय रेल्वे व्यवस्थापक गौरव पारधी, आमदार कटंगी आणि समितीच्या इतर सदस्यांच्या उपस्थितीत उपस्थित होते. सरांनी स्वागत केले. विविध लोकप्रतिनिधींव्यतिरिक्त, ऑपरेशन्स, कॉमर्स, इंजिनिअरिंगमधील अधिकारी, सिग्नल आणि टेलिकम्युनिकेशन, इलेक्ट्रिकल, सेफ्टी, मेकॅनिकल आणि इतर विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीचा मुख्य उद्देश रेल्वे प्रशासन आणि रेल्वे वापरकर्त्यांमधील संवाद अधिक मजबूत करणे हा होता. नागपूर विभागात प्रवाशांच्या गरजा प्रत्यक्ष समजून घेणे आणि प्रवाशांच्या सुविधा, सेवा दर्जा आणि सुरक्षिततेत सतत सुधारणा करणे. सुधारणा सुनिश्चित करणे. बैठकीत प्रवाशांशी संबंधित अनेक महत्त्वाच्या आणि व्यावहारिक मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली, ज्यात समाविष्ट आहे प्रामुख्याने प्रवासी गाड्यांचे थांबे आणि वेळापत्रक, रेल्वेचे कामकाज, वक्तशीरपणा आणि स्थानकांवरील गर्दी व्यवस्थापनात सुधारणा. स्वच्छता, पिण्याचे पाणी, शौचालये आणि प्रकाश व्यवस्था, अपंग, ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांसाठी सुविधा, स्थानके परिसर, परिभ्रमण क्षेत्र आणि पार्किंग व्यवस्था, प्रवासी माहिती प्रणाली, घोषणा आणि डिजिटल प्रदर्शन, प्रवाशांची सुरक्षा, विषयांमध्ये रेल्वे सुरक्षा उपाय आणि तक्रार निवारण प्रणाली, व्यावसायिक सेवांचा विस्तार आणि प्रवाशांचे समाधान यांचा समावेश होता.

बैठकीदरम्यान, नागपूर विभागाचे वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक श्री दिलीप सिंग यांनी नागपूर विभागाविषयी सादरीकरण केले. सर्व विभागांनी केलेल्या कामाबद्दल विस्तृत माहिती देण्यात आली, ज्यामध्ये उपलब्ध व्यावसायिक आणि प्रवासी सुविधांचा समावेश आहे. राखीव आणि अनारक्षित तिकीट प्रणाली, डिजिटल तिकीट, ऑनलाइन सेवा आणि कॅशलेस पेमेंट, यात्री सुविधा केंद्र, मदत कक्ष आणि तक्रार निवारण यंत्रणा, खानपान, स्थानकांवर ऑन-बोर्ड सेवा आणि खानपान व्यवस्था, स्वच्छता मोहिमा आणि सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी, महसूल वाढवण्यासाठी उचललेली पावले, प्रवाशांच्या हितासाठी प्रस्तावित भविष्यातील योजनांची सविस्तर माहिती समिती सदस्यांनी सादरीकरण उपयुक्त आणि माहितीपूर्ण असल्याचे वर्णन केले. सादरीकरणानंतर, समिती सदस्यांनी त्यांच्या संबंधित क्षेत्रांशी संबंधित प्रवाशांच्या समस्या, अपेक्षा आणि सर्जनशील कल्पनांवर चर्चा केली. विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांनी या सर्व सूचना गांभीर्याने ऐकल्या आणि विभागीय रेल्वे व्यवस्थापकांनी आश्वासन दिले की समितीने दिलेल्या सर्व सूचनांची सखोल तपासणी केली जाईल.

# निःशुल्क आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीर उत्साहात संपन्न



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ३० :

दिनांक २६ जानेवारी २०२६ ला रिआन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल रामटेक व आकाशझेप फाउंडेशन रामटेक यांचे संयुक्त विद्यमाने ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त रिआन हॉस्पिटलमध्ये निःशुल्क आरोग्य तपासणी व उपचार आणि रक्तदान शिबीर उत्साहात संपन्न झाले. यावेळी रुग्णालयात उपलब्ध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक रिआन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. प्रदीप बोरकर यांचे मार्गदर्शनाखाली देशाच्या सीमेवर लढणारे वीर सैनिक दीपक बंधाटे यांचे शुभहस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. निःशुल्क सामान्य तपासणी, शुगर तपासणी, नेत्र तपासणी, स्त्रीरोग तपासणी, इसीजी, बालरोग तपासणी, हाडांची तपासणी, फुफ्फुसांची तपासणी, हृदयरोग तपासणी, नेत्ररोग तपासणी, कर्करोग तपासणी करण्यात आली. परिसरातील ११२ रुग्णांनी शिबिरातील विविध आरोग्य सेवांचा लाभ घेतला. यावेळी ३५ व्यक्तींनी रक्तदानाचे मानवता व राष्ट्रीयतेचा कृतिशील संदेश दिला. याच वेळी साक्षोधन कडबे यांनी त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील ३८वे ऐच्छिक रक्तदान केले हे येथे उल्लेखनीय आहे.

यावेळ शिबिरात हॉस्पिटल डॉ. संजय नानोटकर, डॉ. आशिष सांगोडे, डॉ. वर्षा गजभिये, डॉ. मुक्ता गोंदुळे, डॉ. रवी लिखीतकर, डॉ. दुलेश जगने, डॉ.वसीम पठाण, संजीवनी आय केअरचे संचालक प्रशांत उराडे, डॉ. स्मिता बाविस्कर यांनी वैद्यकीय सेवा प्रदान केली. कार्यक्रमाचे संचालन आम्ही भारतीय अभियानाचे मुख्य संयोजक साक्षोधन कडबे यांनी केले. कार्यक्रमाला रिआन हॉस्पिटलच्या संचालक डॉ. वैशाली बोरकर, ॲड. प्रफुल्ल अंबादे,पत्रकार नत्थुजी घरजाडे, नितीन कराडे, आकाशझेपचे अध्यक्ष प्रा. अरविंद दुनेदार, कोषाध्यक्ष दिलीप पवार, संचालक वैभव तुरक, सुनील वरठी, अर्चना कडबे, प्रदीप कडबे, वेणुधर भीमटे, सुनील खुरगे, कृष्णा कावळे, सचिन वलोकर, प्रफुल्ल अनकर,उमेश पापडकर सह आदी उपस्थित होते.

# फिजिक्सवालाकडून सीबीएसई इयत्ता दहावी विद्यार्थ्यांसाठी मोफत शंका निरसन साह्य आणि मॉक प्रीबोर्ड परीक्षेची सुविधा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

शिक्षण कंपनी फिजिक्सवाला (पीडब्ल्यू)ने विद्यार्थ्यांना साह्य करणाऱ्या उपक्रमाची घोषणा केली. या उपक्रमाचा २०२६ मध्ये इयत्ता दहावी सीबीएसई बोर्ड परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना साह्य करण्याचा मनसुबा आहे. देशभरातील विद्यार्थी मोफत शंका निरसन आणि तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळवू शकतात.

हा उपक्रम पीडब्ल्यू विद्यार्थ्यांसह देशभरातील कोणत्याही इयत्ता दहावीमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी खुला आहे. हा उपक्रम परीक्षेदरम्यान येणारा अभ्यासाचा ताण कमी करण्यास मदत करण्यासाठी डिझाइन आला आहे.

पीडब्ल्यू देशभरात विज्ञान व गणित विषयामधील ऑफलाइन प्रीबोर्ड परीक्षेची सुविधा देखील देईल, ज्यामागे विद्यार्थ्यांना सुसज्ज करणाचा मनसुबा आहे. पीडब्ल्यूची प्रत्यक्ष केंद्रे जसे विद्यापीठ, पाठशाला व ट्यूशन सेंटर्स येथे या परीक्षा घेण्यात येतील, ज्यामुळे विद्यार्थ्यांना खऱ्या बोर्ड परीक्षेचा अनुभव मिळेल, तसेच परीक्षेबाबत येणारा ताण दूर होत विषयामधील प्रभुत्व व वेळेचे व्यवस्थापन करण्याची कौशल्ये सुधारण्यास मदत होईल.

फिजिक्सवाला (पीडब्ल्यू)च्या विद्यापीठ-ऑफलाइनचे सीईओ अंकित गुप्ता म्हणाले, "शिक्षणामध्ये कोणताच अडथळा आला नाही पाहिजे, विशेषतः विद्यार्थी बोर्ड परीक्षांसारख्या जीवनातील निर्णायक क्षणासाठी तयारी करत असताना त्यांना कोणत्याच समस्यांचा करावा लागला नाही पाहिजे. अनेक विद्यार्थ्यांना परीक्षेची तयारी करण्यासाठी पाहिजे तसा पाठिंबा व मार्गदर्शन मिळत नाही आणि एका शंकेचे निरसन झाले नाही तरी मोठा ताण येऊ शकतो. आमच्यासह नोंदणी केलेली असो किंवा नसो, प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी आमचे विद्यापीठ, पाठशाला व ट्यूशर सेंटर्स सुरू करत आम्ही विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये साह्य करत आहोत. विद्यार्थ्यांना पाठिंबा मिळत असल्याचे, आत्मविश्वास आणि त्यांच्या संपूर्ण क्षमतेसह उत्तम कामगिरी करण्यासाठी सुसज्ज असल्याचे वाटावे, अशी आमची महत्त्वाकांक्षा आहे."

संपूर्ण भारतातील विद्यार्थी त्यांच्या जवळच्या पीडब्ल्यू विद्यापीठ, पाठशाला किंवा ट्यूशन सेंटरला भेट देऊ शकतात, जेथे त्यांना बोर्ड परीक्षेपर्यंत वैध असलेले डाऊट बस्टर पास मिळेल, तसेच शंका निरसन करण्यासाठी स्लॉट बुक करू शकतात. अनुभवी शिक्षकवर्ग विविध शंकांचे निरसन करतील, गुंतागुंतीच्या विषयांचे सविस्तरपणे स्पष्टीकरण करतील आणि परीक्षेमध्ये उत्तर लिहिण्याच्या तंत्रांबाबत धोरणात्मक मार्गदर्शन करतील. विद्यार्थी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित व जीवशास्त्र अशा विषयांमधील शंकांबाबत स्पष्टीकरण मिळवू शकतात. तसेच त्यांना सीबीएसई इयत्ता दहावी अभ्यासक्रमाकरिता रिव्हिजन कार्डस् देखील मिळतील, ज्यामुळे परीक्षेची तयारी करण्यामध्ये साह्य मिळेल.

# मनपात दोन मिनिटे मौन पाळून हुतात्म्यांना दिली आदरांजली



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करीत दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून हुतात्मा दिनानिमित्त हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

मनपा मुख्यालयात सकाळी ११ वाजता आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांनी दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून मौन श्रद्धांजली अर्पण केली. त्याचप्रमाणे यावेळी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या तैलचित्राला आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी पुष्पहार अर्पण केला व इतर अधिकाऱ्यांनी पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त श्रीमती वैष्णवी बी, उपायुक्त निर्भय जैन, उपायुक्त श्री. मिलिंद मेश्राम, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, उपायुक्त मंगेश खवले, नगररचना विभागाचे उपसंचालक गिरीश गोडबोले, सहायक आयुक्त श्याम कापसे, कार्यकारी अभियंता रविंद्र बुंधाडे, कार्यकारी अभियंता अनिल गेडाम, नगररचना विभागाचे सहाय्यक संचालक ऋतुराज जाधव, सहायक विधी अधिकारी सुरज परोचे, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, प्रमोद हिवसे यांच्यासह मनपाचे इतर अधिकारी-कर्मचाऱ्यांनी देखील आदरांजली वाहिली.

# बॅरि. शेषराव वानखेडे यांना अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

नागपूर नगरीचे प्रथम महापौर बॅरिस्टर शेषराव वानखेडे यांच्या पुण्यतिथी निमित्त (ता. 30) विनम्र अभिवादन करण्यात आले. नागपूर महानगरपालिकेचे उपायुक्त निर्भय जैन यांनी मनपा मुख्यालयातील हिरवळीवर असलेल्या बॅरिस्टर शेषराव वानखेडे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी सहायक आयुक्त श्याम कापसे, उद्यान संवर्धक अमोल चौरपगार, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, जनसंपर्क विभागाचे अमोल तपासे यांच्यासह मनपाचे इतर कर्मचारी उपस्थित होते.

# रात्री प्रकाशित आणि दिवसा सुरक्षित असे बनले बेसा मधील पूल

■ महासागर प्रतिनिधी, बेसा, दि. ३० :



बेसा नगरपंचायतने सात मुख्य पुलांना लोखंडी सुरक्षा गार्ड लावून अनोखी संरचना करून कलात्मक जाळी आकर्षक पेंटिंग याबरोबरच एलईडी लाईट लावून अप्रतिम सजावट केली आहे.

यात केवळ सुरक्षा दृष्टी नसून त्याबरोबरच सौंदर्यदृष्टी देखील सामील आहे. त्यामुळे हा भाग शहरात एक नवीन ओळख बनविलेला बनला आहे. पुलांवर लावलेल्या जाळीमध्ये विविध खेळ, निसर्ग सौंदर्य,प्राणी, सांस्कृतिक परंपरा, आधुनिक कला, लोककला आणि रांगोळी यांचे मनमोहक चित्रे बनवलेली आहेत. रात्री जेव्हा हे पूल चमकतात प्रकाशित होतात तेव्हा वाहन चालक आणि प्रवासी एका अद्भुत दृश्याचा आनंद घेतात.

या सजावटी बरोबरच बेसा नगरपंचायतने अंतर्गत प्रमुख मार्ग जसे बेसा ते मानेवाडा रोड सीताबाई घाट पिपलाचा नाला मनीष नगर ते ओंकार नगर मार्ग आणि इतर स्थानांवर सात पुलांवर लोखंडी सुरक्षा गार्ड लावलेले आहेत. गेल्या काही वर्षात या पुलांवर सुरक्षेचे कोणताही उपाय केलेले नव्हते, ज्याच्यामुळे पावसाळ्यात परिस्थितीत अपघाताचा धोका कायम असायचा. मुख्यत्वे दोन वर्षात आधी घोगली मार्ग येथील नाल्यामध्ये पूर आला असता एक एका व्यक्तीने प्राण गमावले होते. ह्या घटनेला मनामध्ये स्थान देऊन मुख्याधिकारी भारत नंदनवार यांनी उपरोक्त पुलांवर लोखंडी सुरक्षा गार्ड लावण्याचा निर्णय घेतला.

त्यांचे हे पाऊल फक्त सुरक्षा नसून आपल्या नागरिकांना आपल्या परिसराची एक वेगळी ओळख बनवून देणे ही होती. या अनोख्या विकास कायार्ला सफल बनवण्यासाठी बेसा तील नगरपंचायतचे प्रशासनिक अधिकारी मोहित राजनकर कर अधिकारी अजय वाघमारे लेखपाल विष्णू गायकवाड नगररचना अभियंता अभिजीत हांडे निर्माण कार्य अभियंता विजय सुरवसे स्वच्छता अभियंता पूजा जाधव विद्युत अभियंता राहुल मारवाडी आदिंनी मोठे योगदान दिले आहे.

# गांधीजींच्या पुण्यतिथीनिमित्त काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३० :



वाडी शहर काँग्रेस व वाडी शहर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्या संयुक्त सहकार्याने शुक्रवार ३० जानेवारी रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त राष्ट्रपिता महात्मा गांधी चौकात माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.उपस्थित मान्यवरांनी महात्मा गांधी यांच्या विचारांचे स्मरण करून अहिंसा, सत्य व राष्ट्रसेवेच्या मार्गावर चालण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी नागपूर जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अश्विन बैस, विरोधी पक्ष नेते श्याम मंडपे, माजी नगराध्यक्ष प्रेम झाडे, नगरसेवक आशिष पाटील, संजय जीवनकर, मोहन ठाकरे, चंद्रशेखर येवले, किशोर नागपूरकर, भीमराव कांबळे, पंकज फलके, गणेश, वाडी शहर महिला काँग्रेस अध्यक्ष अरुणा पगाडे, निता मडावी, दिव्यानी गजभिये, अतुल देरकर, अतुल खाडे, आशिष रामटेके, रोशन रागीट, रितेश सोमकुवर, अभिनव वड्डेवार, मंगेश राजपूत, रितेश डिग्रासे, सागर बैस, मिथुन वायकर, मयूर कडे, अमेय सरोदे, लखन, रोहित रेवतकर यांच्यासह काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिवसेना (उबाठा) पक्षातर्फे नागपुरात शोकसभेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नागपूर च्या वतीने आज स्थानिक 'शिवसेना महानगर कार्यालय ' येथे एका विशेष शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या कार्यक्रमाला पक्षाचे संपर्कप्रमुख सतीश हरडे आणि नागपूर महानगर प्रमुख किशोर कुमेरिया यांची प्रमुख उपस्थिती होती. महीला आघाडी जिल्हा सघटिका सुरेखाताई खोब्रागडे, महीला उपशहर प्रमुख मगलाताई राणे त्यांच्यासोबतच शहर प्रमुख संदीप रियाल पटेल, विक्रम राठोड आणि हरिभाऊ बनाईतचे या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी अजित पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी शिवसेना भवनाचा परिसर शिवसैनिकांच्या गर्दीने आणि गंभीर वातावरणाने व्यापला होता.

शोकसभेदरम्यान मान्यवरांनी 'दादांच्या' (अजित पवार) कायार्चा गौरव केला. त्यांच्या राजकीय प्रवासातील योगदानाबद्दल बोलताना पदाधिकारी म्हणाले. दादांच्या कामाची पद्धत, प्रशासकीय पकड आणि त्यांचा दांडगा जनसंपर्क हा नेहमीच कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शक राहिला आहे. त्यांच्या जाण्याने राजकीय क्षेत्रातील एक अनुभवी नेतृत्व हरपले आहे. यावेळी संदीप रियाल पटेल, विक्रम राठोड आणि हरिभाऊ बनाईत, गुलाब भोयर, यांनी देखील आपल्या भावना व्यक्त केल्या. ज्या शिवसैनिकांनी दादांना जवळून पाहिले होते, त्यांनी



त्यांच्या स्वभावाचे आणि कार्यशैलीचे विविध पैलू मांडताना आपल्या आठवणींना उजाळा दिला. नितीन सोळंके, विकास गजभिये, सतीश पाठक, कमल पाठक, प्रतीक धुळे, रोहित गौर ,गणेश गौर, ललित सोनकुसरे, आशिष देशमुख शिवसैनिकांची उपस्थिती होती.

# रविवारी विदर्भ शिक्षक संघाची निर्णायक सभा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३० :

विदर्भ नगर परिषद व महानगर पालिका शिक्षक संघाच्या वतीने नागपूर येथील गणेशपेठ बस स्टॅण्ड समोरील अध्यापक भवन येथे रविवार, १ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ ते ४ या कालावधीत निर्णायक सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेमध्ये शिक्षक संघटनेची नवीन कार्यकारिणी निवड करण्यात येणार असून, ही निवड प्रक्रिया संघाच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

# ब्लेस हॉस्पिटलमुळे बचावला महिला मजुराचा जीव आणि हात

■ महासागर प्रतिनिधी, मौदा, दि. ३० :



दुःखी माणसाला मदत करण्यासाठी पुढे केलेला एक हात प्रार्थनेसाठी जोडलेल्या दोन हातांपेक्षा अधिक उपयुक्त असतो. त्याचप्रमाणे गरीब आणि गरजू रुग्णांवर निःशुल्क उपचार आणि शस्त्रक्रिया करणारा डॉक्टर त्या रुग्णांसाठी साक्षात परमेश्वर असतो... परंतु, स्पर्धा आणि महागाईच्या काळात हे शक्य तरी आहे का? हो! मौदा शहरातील एका अस्थिरोग तज्ञ डॉक्टरने हे शक्य करून दाखविले आहे.

मौदा तालुक्यातील पाणमारा येथील गरीब कुटुंबात आपला उदरनिर्वाह चालवणारी एका महिलेच्या हातातील कोयत्याला शेतातील विद्युत तारांचा स्पर्श झाल्याने त्या महिलेचे हात भाजले, लगेच तिने आरडाओरड करत तिला मौदा येथील ब्लेस हॉस्पिटल मध्ये दाखल करून देवदूत डॉक्टरांच्या उपचाराने तिचा अखेर जीव वाचला.

तालुक्यातील पानमारा येथील एक गरीब महिला चंद्रकला तुलसीदास पिकलमुंडे ही महिला आपल्या शेतात पाणी देण्यासाठी गेली होती. पाणी देता देता ती धारदार लोखंडी कोयत्याने ती काम करीत होती. अचानक जवळुन जाणाऱ्या एका विद्युत तारांचे स्पर्श त्या हातात असलेल्या कोयत्याला लागताच ती खाली कोसळली. तिच्या हाताचे अंगठे भाजल्या गेले तिला मोठ्या वेदना होऊ लागल्या तिची प्रकृती चिंताजनक असल्याने तिला तिच्या परिसरातील नागरिकांनी लगेच मौदा येथील ब्लेस हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.

डॉ. आशिष सावरकर यांनी अशा परिस्थितीत तिच्यावर तात्काळ उपचार केले, डॉ. आशिष सावरकर यांना प्रदीर्घ अनुभव असल्याने असह्य वेदनेने तडफडत आलेला रुग्ण आरोग्य उत्तम असेल तर खऱ्या अर्थाने जीवनाचा परिपूर्ण आनंद घेता येऊ शकतो. आरोग्य स्वस्थ नसेल तर संपत्तीला अर्थ राहात नाही. अस्वस्थ आणि आजारी व्यक्तीला आयुष्य डॉ. सावरकर यांनी रुग्णसेवा आणि मानवसेवेसाठी स्वतःला वाहून घेतले आहे. समाजाप्रति असलेली बांधीलकी आणि गरीब रुग्णांच्या वेदना त्यांना प्रेरणा देतात. आजही ते निरंतर रुग्णसेवेत असतात.

# आई.जी.ओ.टी मिशन कर्मयोगी सेमिनार आयोजित

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

नागपूर विभाग, मध्य रेल्वे अंतर्गत गुंजन सभागृहात आई.जी.ओ.टी मिशन कर्मयोगी सेमिनार यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आले. या सेमिनारचे मुख्य उद्दिष्ट मिशन कर्मयोगी अंतर्गत क्षमता विकास आणि अनिवार्य प्रशिक्षणाबद्दल जागरूकता निर्माण करणे होते.



सेमिनाराचे आयोजन कार्मिक विभाग यांनी केले, ज्यात मुख्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. कार्मिक विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच इतर विभागांमधील अधिकारी व कर्मचारी जसे की इलेक्ट्रिकल, सिग्नल आणि दूरसंचार, आणि ट्रॅफिक यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. सुमारे 250 रेल्वे कर्मचारी या सेमिनारमध्ये उपस्थित होते. वर्ष 2025-26 साठी अनिवार्य ठरवलेल्या अभ्यासक्रमांची माहिती दिली गेली आणि सर्व कर्मचाऱ्यांनी 100% अनिवार्य अभ्यासक्रम पूर्ण करण्यावर भर देण्यात आला.

## निधन वार्ता

### लक्ष्मीकांता देशमुख



नागपूर : सोशल ॲक्टिविस्ट राजीव झोडापे यांच्या सासूबाई लक्ष्मीकांता देशमुख रा. बुध्द नगर, युनिट २, नागपुर यांचे वयाच्या 84 वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. सामाजिक न्याय खात्यात वरिष्ठ अधिकारी म्हणून त्यांनी सेवा दिली होती. त्यांचे अंतिम संस्कार वैशाली घाट, नागपूरला पार पडले. त्यांच्या पच्छात जावई, मुली व नातवंडे असा बराच मोठा परिवार आहे.

# जगद्गुरु संत तुकाराम महाराज जन्मोत्सवानिमित्त भव्य व्याख्यान

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. ३० :

जगद्गुरु संत तुकाराम महाराज विचार मंच तर्फे तुकाराम महाराज जन्मोत्सवाचे औचित्य साधून काटोल येथे एका विशेष वैचारिक व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोज रविवार सायंकाळी ५ वाजता, बँक ऑफ इंडिया समोरील 'जगद्गुरु संत तुकाराम महाराज व्यापारी संकुल' येथे हा सोहळा पार पडणार आहे.

या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण मंत्री माननीय श्री. वसंतजी पुरके उपस्थित राहणार आहेत. ते "जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचा वैज्ञानिक दृष्टिकोन" या विषयावर आपले अभ्यासपूर्ण विचार मांडतील. संत तुकारामांच्या अभंगांतून डोकावणारे विज्ञान, तर्कसंगत विचार आणि मानवतावाद यांचा उलगडा या व्याख्यानातून केला जाणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲडव्होकेट दीपक केने असतील.

कार्यक्रमात इतिहासतज्ज्ञ डॉ.प्रा. सतीश महल्ले यांनी लिहिलेल्या "संत तुकारामांच्या अभंगातील तत्त्वज्ञान व विचार" या नवीन पुस्तकाचे विमोचन करण्यात येईल.संत साहित्याचा अभ्यास करणाऱ्यांसाठी हे पुस्तक मोलाचे ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. तसेच खानगाव येथील एका शेतकऱ्याने वैयक्तिक कारणातून शेतातील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, कर्तव्यावर असलेले काटोल पोलीस स्टेशनचे शिपाई प्रमोद किसन कोहळे यांनी क्षणाचाही विलंब न करता स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता विहिरीत उडी घेतली आणि संबंधित शेतकऱ्याचे प्राण वाचवले. त्यांच्या या धाडसी कामगिरीबद्दल विचार मंचाच्या वतीने या कार्यक्रमात त्यांचा जाहीर सत्कार करण्यात येणार आहे.

या वैचारिक आणि सांस्कृतिक मेळाव्यास काटोल व नरखेड तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक राजू धवड, स्वप्नील राऊत, भूषण भोयर, घनश्याम भडांगे, प्रा. मंगेश आचार्य, ज्ञानेश्वर मोहोड, ज्ञानेश्वर इरखेडे प्रशांत वीरकरे, प्रवीण धोटे, किशोर ढोकणे, रत्नाकर ठाकरे, प्रा. सतीश महल्ले, मंगेश बर्डे, प्रवीण ढोकणे सुरज कोठे मोरेश्वर साबळे, योगी रामजी कराळे सहकाऱ्यांनी केले आहे

# नियमित लसीकरणापासून माता व बालक वंचित राहू नये

# टास्क फोर्स समितीच्या बैठकीत घेतला आढावा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :**

नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून शहरातील मनपा रुग्णालय, शासकीय व खासगी दवाखान्यांमध्ये होणाऱ्या नियमित लसीकरणापासून वंचित राहिलेल्या माता व बालकांचे लसीकरण व उपाययोजनांच्या अनुषंगाने मंगळवार (ता. ३०) शहर टास्क फोर्सची समितीची बैठक मनपा मुख्यालयातील अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत त्यांच्या सभा कक्षामध्ये पार पडली. यावेळी ज्या बालकांचे लसीकरण झालेले नाही, त्याकरिता विशेष प्रयत्न करून ते वेळीस पूर्ण करावे, असे निर्देश जागतिक आरोग्य संघटनेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहम्मद साजीद यांनी यावेळी झोनल वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिले.



बैठकीस मा. अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, मा. माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. सरला लाड, जागतिक आरोग्य संघटनेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहम्मद साजीद खान,साथरोग अधिकारी डॉ गोवर्धन नवखरे,झोनल वैद्यकीय अधिकारी डॉ. शीतल वंदिले, डॉ. सुलभा शेंडे, डॉ. जयश्री चन्ने, डॉ. ख्वाजा मोईनुद्दीन, डॉ. सुनील कांबळे, डॉ. विजयकुमार तिवारी, डॉ. दीपांकर भिवगडे, डॉ. गजानन पवाने, डॉ. अतीक खान, एन. यु, एच, एमचे शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. अश्विनी निकम पी.एच.एन अर्चना खाडे, तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीत शहरातील नियमित लसीकरण कार्यक्रमाचा आढावा घेण्यात आला तसेच बालक, गर्भवती माता व लाभार्थ्यांपर्यंत लसीकरण सेवा अधिक प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. लसीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण करणे, क्षेत्रीय पातळीवरील अडचणी, जनजागृती वाढवणे व विविध विभागांमधील समन्वय अधिक बळकट करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

बैठकीत शहरातील साथरोग निर्मुलनाच्या पायरीवर आहेत, आपल्या सतत प्रयत्नांमुळे हे साथरोग समूळ नष्ट होतील असे जागतिक आरोग्य संघटनेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहम्मद साजीद यांनी यावेळी सांगितले. बैठकीत सर्वप्रथम डॉ. सरला लाड यांनी बैठकीच्या मुद्द्यांची माहिती दिली. त्यानंतर डॉ. साजीद यांनी झोननिहाय नियमित लसीकरण कार्यक्रमाचा आढावा घेत माहिती दिली. त्यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे शहरातील प्रत्येक झोनअंतर्गत असलेली नियमित लसीकरणाची स्थिती मांडली. नवजात बालकांपासून ते गरोदर मातांना विविध प्रकारचे लसीकरण केले जात असून, या लसींपासून कुणीही माता आणि बालक वंचित राहू नये यावर भर देण्यात आला.

संपूर्ण शहरात नवजात बालकांचे पहिल्या दिवसांपासून इतर सर्व नियमित लसीकरण हे वेळेवर योग्यरित्या आणि शंभर टक्के व्हावे, यादृष्टीने झोनस्तरावर नियोजन आणि कार्यवाही करण्याचे निर्देश यावेळी जागतिक आरोग्य संघटनेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहम्मद साजीद खान यांनी झोनल वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिले.

# ओडिशातून कारने गांजाची तस्करी

## भंडारा-नागपूर महामार्गावर चौघांना अटक, ५ किलो माल जप्त

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :**

शहरात अमली पदार्थांविरोधात राबविण्यात येत असलेल्या ऑपरेशन थंडर अंतर्गत शहर गुन्हे शाखेला मोठे यश मिळाले आहे. पारडी पोलिस ठाण्यांतर्गत भंडाराझनागपूर राष्ट्रीय महामार्गावर कापसी बुर्ज गावाजवळ गुन्हे शाखा युनिट-५ ने छापेमारी करत एका कारमधून ५ किलो गांजा जप्त केला. या प्रकरणी पोलिसांनी घटनास्थळावरून चार आरोपींना अटक करीत गांजा व कारसह सुमारे ६.५० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. फैजान फिरोज अंसारी, अहमद खान, मोहम्मद शाहीद आणि फिरदौस खान (सर्व रा. कामठी)अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

काही तस्कर ओडिशा राज्यातून रस्तेमार्गे गांजाची खेप घेऊन नागपूरकडे येत असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. या माहितीच्या आधारावर युनिट-५च्या पथकाने भंडारा-नागपूर महामार्गावर संशयित वाहनांवर लक्ष ठेवले. शुक्रवारी पहाटे कापसी बुर्ज गावासमोर एका सिल्व्हर रंगाच्या ७ सीटर कारला थांबवून झडती घेतली. एका प्लास्टिकच्या पोत्यात एकूण ५ किलो गांजा आढळून आला. ज्याचे बाजार मूल्य जवळपास १.२५ लाख रुपये आहे. तसेच गांजा ठेवण्यासाठी वापरलेल्या प्लास्टिक पिशव्या, रोकड, ३ मोबाईल फोन आणि तस्करीसाठी वापरलेली कारही जप्त केली.





### रवि भाईचा शोध सुरू

प्राथमिक चौकशीत आरोपींनी सांगितले की, त्यांनी हा गांजा ओडिशातील काटाबांजी येथील रवि भाई नावाच्या तस्कराकडून खरेदी केला होता. या प्रकरणातील मुख्य पुरवठादार रवि भाईचा शोध घेण्यासाठी पोलिस पथके रवाना करण्यात आली असून नागपूर शहरात गांजाची विक्री कुठे आणि कोणाला होणार होती, याचाही तपास सुरू आहे. पारडी पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सुरू आहे.

# यशोदा हॉस्पिटल्समध्ये फुफ्फुस आणि वक्षस्थळ प्रत्यारोपण सुविधांचा विस्तार





■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३० :**

यशोदा हॉस्पिटल्सने नागपूर, इंदूर आणि रायपूरसह मध्य भारतात त्यांच्या आउटरीच क्लिनिकचा विस्तार करण्याची घोषणा केली आहे. रुग्णांना त्यांच्या स्वतःच्या शहरांमध्ये उच्च दर्जाचे डोळे आणि फुफ्फुस प्रत्यारोपण आणि योग्य काळजी प्रदान करणे हे यामागील उद्दिष्ट आहे. यशोदा हॉस्पिटल्सने आजपर्यंत ५०० हून अधिक छाती आणि फुफ्फुस प्रत्यारोपण यशस्वीरित्या केले आहेत. नव्याने तयार केलेले आउटरीच क्लिनिक नियमित फॉलो-अप काळजी प्रदान करतील, ज्यामुळे रुग्ण आणि कुटुंबाची काळजी आणखी सुधारेल.

या विषयावर बोलताना, यशोदा हॉस्पिटल्सचे सल्लागार डॉ. मंजुनाथ बाले (रोबोटिक अँड मिनिमली इनव्हेसिव्ह थोरॅसिक सर्जन) यांनी माहिती दिली की, आउटरीच क्लिनिकचे उद्दिष्ट थोरॅसिक आणि फुफ्फुस प्रत्यारोपण सेवा सुधारणे आणि सुलभ करणे आहे आणि आमचे उद्दिष्ट रुग्णांना कमी प्रवासाच्या अंतरात जागतिक दर्जाच्या तज्ञांचे फायदे मिळू शकतील याची खात्री करणे आहे.

अधिक माहितीसाठी रुग्ण यशोदा रुग्णालयातील वक्षस्थळ आणि फुफ्फुस प्रत्यारोपण विभागाशी संपर्क साधू शकतात. अशी माहिती पत्रकार परिषदेत डॉ. मंजुनाथ बाले यांनी दिली. की यशोदा ग्रुप ऑफ हॉस्पिटल्स गेल्या तीन दशकांपासून दजेर्दार आरोग्य सेवा प्रदान करत आहे. कुशल नेतृत्व आणि मजबूत व्यवस्थापनाखाली, यशोदा ग्रुप वैद्यकीय सेवेचे सर्वोच्च दर्जा प्रदान करतो.यशोदा हॉस्पिटल्समध्ये हैदराबादच्या सोमाजीगुडा, सिकंदराबाद, मलकपेट आणि हाय-टेक सिटीमध्ये 4,000 बेडची चार रुग्णालये आहेत. यशोदा ग्रुप ऑफ हॉस्पिटल्स परवडणाऱ्या दरात जागतिक दर्जाच्या आरोग्य सेवा प्रदान करतात.

## आय.आय. एम.च्या पुढाकारातून होणार

# महाराष्ट्रातील गावांचा कायापालट

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३० :**

महाराष्ट्रातील ग्रामीण विकासाला नवी दिशा देणाऱ्या एका महत्त्वपूर्ण उपक्रमाला आज भारतीय व्यवस्थापन संस्था नागपूर येथून सुरुवात करण्यात आली. आय. आय. एम. नागपूर, टाटा मोटर्स फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त सहकार्याने इंटिग्रेटेड व्हिलेज डेव्हलपमेंट प्रोग्राम IVDP 2.0 राबवण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत राज्यातील गावांचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास साधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.





**टाटा मोटर्स फाउंडेशन व राज्य सरकारसोबत करार**

या संदर्भातील सामंजस्य करारावर आय. आय. एम. नागपूरचे संचालक डॉ. भिमराया मेत्री आणि टाटा मोटर्स फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनोद कुलकर्णी यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या प्रसंगी मुख्यमंत्री कार्यालयाच्या वतीने प्रिया खान, आय. आय. एम. नागपूरचे प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस असलेले माजी आयएएस अधिकारी प्रो. अनूप कुमार, आय. आय. एम. चे मुख्य कार्यक्रयरी अधिकारी कर्नल मकरंद अलूर आणि प्रा. नीलकंठ ढोणे हे उपस्थित होते.

या उपक्रमात टाटा मोटर्स फाउंडेशन आर्थिक सहकार्य करणार असून, राज्य सरकार प्रशासकीय पाठबळ देणार आहे. भारतीय प्रबंध संस्थान नागपूर या प्रकल्पासाठी नॉलेज पार्टनर म्हणून काम करणार आहे. तसेच राज्याची प्रशिक्षण संस्था यशदा यांच्या सहकार्याने क्षेत्रीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार असून, सरकारी योजना थेट गरजूंपर्यंत पोहोचवण्यावर भर देण्यात येणार आहे.

या वेळी बोलताना डॉ. भिमराया मेत्री, नागपूरच्या प्रबंध संस्थानचे ज्ञान केवळ वर्गखोल्यांपुरते मर्यादित राहू नये, ही आमची भूमिका आहे. या उपक्रमातून आम्ही थेट शेतकरी आणि ग्रामीण कुटुंबांपर्यंत पोहोचत आहोत. आधुनिक व्यवस्थापनाच्या माध्यमातून शिक्षण, शेती आणि उपजीविकेला नवी दिशा देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

विनोद कुलकर्णी यांनी सांगितले की, आय. आय. एम. नागपूर ग्रामपंचायत विकास आराखडा अधिक सक्षम व परिणामकारक बनवण्यासाठी मार्गदर्शन करणार आहे. आराखड्यांची पडताळणी, अंमलबजावणी आणि तीन वर्षांनंतर प्रभाव मूल्यांकन करण्यातही संस्थेचा मोलाचा वाटा असेल, असेही ते म्हणाले.

प्रा. नूप कुमार यांनी सांगितले की, या उपक्रमाचा उद्देश गावांना आत्मनिर्भर बनवण्याचा आहे. महाराष्ट्रातून सुरू होणारा हा मॉडेल प्रकल्प भविष्यात देशातील इतर राज्यांसाठीही आदर्श ठरेल, असे त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रतिनिधी प्रिया खान यांनी राज्य सरकारची कटिबद्धता व्यक्त करत सांगितले की, हा उपक्रम राज्याच्या विकास योजनांना अधिक पारदर्शक, परिणामकारक आणि लोकाभिमुख बनवेल.

# महावितरणचा वीजचोरांना शॉक

**९ महिन्यांत ५ कोटींची वीजचोरी उघड**

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३० :**

महावितरणच्या नागपूर परिमंडलाने वीजचोरी करणाऱ्यांविरुद्ध आपली मोहीम अधिक तीव्र केली असून, एप्रिल ते डिसेंबर 2025 या नऊ महिन्याच्या कालावधीत महावितरणच्या स्थानिक तांत्रिक विभागाने केलेल्या धडक कारवाईत एकूण 1 हजार 963 ठिकाणी थेट वीजचो-या उघडकीस आणल्या आहेत. याशिवाय ज्या कारणासाठी वीज घेतली त्याव्यतिरिक्त इतर कारणासाठी अनधिकृत वापर करणाऱ्या 167 ग्राहकांवरही कार्यवाही करीत एकूण 2 हजार 130 ग्राहकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. महावितरणच्या या मोहिमेमुळे वीजचोरांचे धाबे दणाणले असून, प्रामाणिक ग्राहकांनी या कारवाईचे स्वागत केले आहे.

या नऊ महिन्यांच्या कालावधीत नागपूर जिल्ह्यातील तब्बल 11 हजार 962 ग्राहकांच्या वीज यंत्रणेकडील तपासणी करण्यात आली. त्यापैकी 1 हजार 963 ग्राहकांनी तब्बल 4 कोटी 99 लाख 58 हजार रुपयांच्या 23 लाख 82 हजार 631 युनिट्सची वीज चोरल्याचे स्पष्ट झाले आहे. यापैकी या चोरीच्या बदल्यात महावितरणने नियमानुसार देयके आणि तडजोडीपोटी 1 कोटी 3 लाखांचा दंड असा एकूण 6 कोटी 2 लाखाचे देयक संबंधित ग्राहकांना आकारला आहे. यातील 36 ग्राहकांनी तडजोड करण्यास नकार दिल्याने किंवा गंभीर स्वरूपाची चोरी केल्याने त्यांच्यावर विविध पोलीस ठाण्यांत विद्युत कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

या मोहिमेत वीजचोरीचे अत्यंत प्रगत आणि धक्कादायक प्रकार उघडकीस आले आहेत. कारवाई करण्यात आलेल्या ग्राहकांपैकी 974 जणांनी थेट मुख्य वीज वाहिनीवर 'आकडा' टाकून चोरी केली होती. मात्र, उर्वरित 989 ग्राहकांनी तांत्रिक छेडछाडीचा मार्ग अवलंबला होता. यामध्ये मीटरमध्ये रिमोट कंट्रोल बसवून ते दुरूनच बंद करणे, मीटरच्या मागील बाजूस सूक्ष्म छिद्र पाडून रोध निर्माण करणे, मीटर संथ करण्यासाठी अंतर्गत सर्किटमध्ये बदल करणे किंवा मीटर पूर्णपणे बंद पाडणे अशा 'अफलातून' क्लुप्त्यांचा समावेश आहे. याशिवाय, ज्या कारणासाठी वीज घेतली त्याव्यतिरिक्त इतर कारणासाठी अनधिकृत वापर करणाऱ्या 167 ग्राहकांवरही कारवाई करून 39.30 लाखांची देयके आकारण्यात आली आहेत.

वीजचोरीचा सर्वाधिक फटका हा प्रामाणिकपणे आणि नियमित वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांना बसतो, असे महावितरणने स्पष्ट केले आहे. अनधिकृत विद्युतभारामुळे रोहित्रांवर (ट्रान्सफॉर्मर) क्षमतेपेक्षा जास्त ताण पडतो. यामुळे ट्रान्सफॉर्मर जळणे, शॉर्ट सर्किट होणे आणि वारंवार वीजपुरवठा खंडित होणे असे प्रकार घडतात. यामुळे महावितरणला आर्थिक नुकसानीसोबतच ग्राहकांच्या रोषालाही सामोरे जावे लागते. ही परिस्थिती टाळण्यासाठीच वीजचोरी रोखणे अनिवार्य असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे.

ही विशेष मोहीम महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, संचालक (संचलन) सचिन तालेवार, प्रादेशिक संचालक परेश भागवत आणि मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या थेट मार्गदर्शनाखाली राबवली जात आहे. सदोष मीटर असणारे ग्राहक, सरासरी बिल येणारे ग्राहक आणि 'अभय योजने'चा लाभ न घेतलेले थकबाकीदार यांची कसून तपासणी केली जाणार आहे.

# रामझुला हत्याकांडात दोघांना अटक

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :**

रामझुला पुलाखाली २० जानेवारीच्या रात्री झालेल्या हत्याकांडातील आरोपींना शोधून काढण्यासाठी तहसील पोलिसांनी शतीर्चे प्रयत्न केले आणि अखेर २ आरोपी पोलिसांच्या हाती लागले. मात्र मृताची ओळख अद्यापही पटलेली नाही. प्राथमिक चौकशीत दारू पाजण्यावरून वाद झाल्याचे समोर आले आहे. संतराम सहेदलाल यादव (३२) रा. उमरेड परसिया रोड, छिंदवाडा आणि रघुनार्थ ऊर्फ राजा शुद्धनलाल सोनवणे (३५) रा. चांगुटोला, बालाघाट अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. त्यांचा तीसरा साथीदार अनिल वाघाटे ऊर्फ तोतला याचा शोध सुरू आहे.

आरोपीच्या म्हणण्यानुसार, मृताने आपले नाव मनोज सांगितले होते. तो मोलमजुरी करत होता. आरोपीही मिळेल ते काम करतात. ठियावर त्यांची मनोजशी ओळख झाली होती. रात्री एकत्र दारू पिल्यानंतर, चौघेही शिवभोजन थाळीने पोट भरत असत. २० जानेवारीच्या रात्री मनोजने संतरामला दारू पाजण्यास म्हटले, परंतु त्याने नकार दिला. यामुळे वाद झाला. मद्यपान केल्यानंतर संतराम आणि इतर आरोपींनी मनोजला सिमेंटच्या गट्टूने वार करून ठार मारले आणि पळून गेले. पोलिसांनी नागपूर रेल्वे स्थानक, कॉटन मार्केट, संत्रा मार्केट, मेयो हॉस्पिटल आणि इतवारी रेल्वे स्टेशनसह सुमारे १५० ठिकाणांवरील सीसीटीव्ही फुटेज तपासले. एका फुटेजमध्ये मृतक आणि आरोपी कैद झाले. पोलिसांनी इतवारी स्थानकाजवळून संतरामला अटक केली. चौकशीत त्याने राजाने हत्या केल्याची माहिती दिली. राजाला ताब्यात घेतल्यानंतर सत्य समोर आले.

# श्रीपाद जोशी यांच्या तीन पुस्तकांचे प्रकाशन आज

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :**

डॉ.श्रीपाद भालचंद्र जोशी यांचे राजहंस प्रकाशन प्रकाशित, 'त्यानंतर',पद्मगंधा प्रकाशनातर्फे प्रकाशित ' सर्ग ' हे दोन कविता संग्रह आणि दिलीपराज प्रकाशनातर्फे प्रकाशित ' समीक्षेची संस्कृती आणि संस्कृतीची समीक्षा 'हा समीक्षा विषयक ग्रंथ या तीन पुस्तकांचा प्रकाशन समारंभ शनिवार,३१ जानेवारी,२०२६ रोजी सायं.५.४५ वा.नागपूर येथील पंचशील चौकातील टिळक पत्रकार भवनाच्या पत्रकार परिषद सभागृहात मराठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांच्या अध्यक्षतेखाली, प्रख्यात ज्येष्ठ लेखक,समीक्षक डॉ. वि.स.जोग यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला आहे. डॉ. शैलेंद्र लेंडे, मराठी विभाग प्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, डॉ. कोमल ठाकरे,अधिष्ठाता,मराठी विद्यापीठ, रिद्धपूर हे संबंधित पुस्तकांवर भाष्य करतील. सूत्रसंचालन शुभदा फडणवीस करतील.

या प्रसंगी साहित्य प्रेमींनी आवर्जून उपस्थित राहावे अशी विनंती,सुनील पाटील कार्यवाह,विदर्भ सांस्कृतिक परिषद,अनिल कुलकर्णी संस्थापक संचालक,विश्व मराठी परिषद व,अभिषेक जाखडे, पद्मगंधा प्रकाशन आणि मधुर व मोहित बर्वे संचालक, दिलीपराज प्रकाशन ह्यांनी केली आहे.

## रंगमंच अन् मैदानावर युवकांच्या कौशल्यांचा अविष्कार!

# श्री बिंझाणी सिटी कॉलेजमध्ये 'सिटीफेस्ट २०२६' उत्साहात

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :**

नागपूर शिक्षण मंडळद्वारा संचलित श्री बिंझाणी सिटी कॉलेज येथे वार्षिक स्नेहसंमेलन 'सिटीफेस्ट २०२६' मोठ्या उत्साहात आणि चैतन्यमयी वातावरणात पार पडले. २७ आणि २८ जानेवारी २०२६ रोजी आयोजित या महोत्सवात विद्यार्थ्यांनी आपल्या कला आणि क्रीडा गुणांचे सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुजित मेत्रे आणि सांस्कृतिक समितीचे डॉ. राजेंद्र नाईकवाडे, डॉ. अनिल शेंडे व डॉ. संजय चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली या महोत्सवाचे नेटके नियोजन करण्यात आले होते.





महोत्सवाच्या पहिल्या दिवशी सांस्कृतिक स्पर्धांची रेलचेल होती. फॅशन शो मध्ये विद्यार्थ्यांनी रॅम्पवर आपल्या कौशल्यांचे सादरीकरण केले. मुलींमधून प्रगती रुखाणे (बी.कॉम ३) आणि मुलांमधून तेजस रजक (बी.सी.सी.ए. ३) यांनी 'बेस्ट ओव्हरऑल परफॉर्मन्स'चा बहुमान मिळवला. तर आस्था सोनटक्के आणि ओम कापसे यांना 'बेस्ट थीम परफॉर्मन्स'चा मान पटकावला. नृत्य स्पर्धेत एन.सी.सी.च्या मुलांनी सांघिक गटात प्रथम क्रमांक पटकावला, तर एकल नृत्यात साक्षी कामडी व समीक्षा धांडे यांनी बाजी मारली. यासोबतच मेहंदी स्पर्धेत वेदांती कुंभलकर, रितिका धनाडे व आस्था सोनटक्के यांनी आणि रांगोळी स्पर्धेत अभय चौधरी, देविका चाहुरकर व गुंजन साळवे यांनी यश मिळवून आपल्या कलात्मकतेची मोहोर उमटवली.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर विविध मैदानी खेळांचे आयोजन करण्यात आले. रस्सीखेच स्पर्धेत बी.कॉम.च्या संघाने विजेतेपद मिळवले, तर लगोरी आणि डॉज बॉल स्पर्धांमध्ये कनिष्ठ महाविद्यालयाच्या संघाने आपले वर्चस्व सिद्ध केले. लंगडी स्पर्धेत एम.ए. राज्यशास्त्र विभाग विजेता ठरला. खेळांसोबतच महाविद्यालय परिसरात आयोजित 'आनंदमेळा' हे विद्यार्थ्यांसाठी मुख्य आकर्षण ठरले. यावेळी खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सवर मोठी गर्दी दिसून आली.

या संपूर्ण महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी प्राध्यापकांच्या विविध नियोजन समित्या तयार करण्यात आल्या होत्या. त्या त्या समितीच्या मार्गदर्शनात विविध स्पर्धांचे नेटके आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील एन.एस.एस. व एन.सी.सी. च्या विद्यार्थ्यांनी शिस्तपालनाची बाजू सांभाळली. सर्व स्पर्धांचे परीक्षण तज्ज्ञ परीक्षकांकडून करण्यात आले. दोन्ही दिवसांची ध्वनिव्यवस्था क्रीडा विभागाचे कर्मचारी मंगेश ठवरे यांनी यशस्वीपणे सांभाळली. सर्व स्पर्धांमधील विजेत्यांचा पारितोषिक वितरण समारंभ येत्या काही दिवसांत स्वतंत्रपणे आयोजित करण्यात येईल, असे आयोजन समितीच्या वतीने सांगण्यात आले. प्राचार्य डॉ. सुजित मेत्रे, उपप्राचार्यद्वय डॉ. संदीप तुंडुरवार व डॉ. प्रांजली काणे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच संस्थेचे अध्यक्ष मोहित शाह, उपाध्यक्ष विकास बिंझाणी व सचिव ॲड. राजीवजी देव यांच्या भरीव सहयोगाने पार पडलेल्या या महोत्सवामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळून एकूणच महाविद्यालयात उत्साहाचे वातावरण आहे.

# महावितरणकडून स्वातंत्र्यलढ्यातील हुतात्म्यांना आदरांजली



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३० :**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील ज्ञात-अज्ञात हुतात्म्यांच्या अतुलनीय बलिदानाचे स्मरण करण्यासाठी आणि त्यांच्या राष्ट्रभक्तीला मानवंदना देण्यासाठी आज महावितरणच्या नागपूर परिमंडलात 'हुतात्मा दिन' अत्यंत गांभीयार्ने आणि आदरपूर्वक साजरा करण्यात आला. काटोल रोडवरील 'विद्युत भवन' परिसरात सकाळी ठीक 11 वाजता सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी दोन मिनिटांचे स्तब्ध मौन पाळून देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या वीरांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

30 जानेवारी हा दिवस देशभर हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. याच भावनेतून महावितरण आणि महानिर्मितीच्या वतीने संयुक्तपणे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. केवळ औपचारिकता न ठेवता, आपल्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी सर्वस्वाचा त्याग केला, त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. यावेळी उपस्थित सर्वांनी देशाची एकता आणि अखंडता टिकवून ठेवण्याचा संकल्प देखील मनातल्या मनात अधोरेखित केला.

या प्रसंगी कार्यकारी संचालक - प्रकल्प, महानिर्मिती राजेश पाटील, मुख्य अभियंता, महावितरण नागपूर परिमंडल दिलीप दोडके, मुख्य अभियंता, खापरखेडा औष्णिक वीज निर्मिती केंद्र गिरीश कुमारवार, अधीक्षक अभियंते, महावितरण मंगेश वैद्य व संजय वाकडे, महेश जाधव (सहायक महाव्यवस्थापक - मानव संसाधन), सुधधर टेकाम (वरिष्ठ व्यवस्थापक - वित्त व लेखा), सचिन लहाने (उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी) आणि सागर इंगळे (कार्यकारी अभियंता, महानिर्मिती) यांच्यासह महावितरण व महानिर्मितीचे अन्य वरिष्ठ अधिकारी, कनिष्ठ अभियंता आणि कर्मचा-यांनी आपली उपस्थिती दर्शवून हुतात्म्यांना अभिवादन केले.